# रिया चक्रवर्तीला जामीन

लोकसत्ता प्रतिनिधी



**मुंबई :** अभिनेता सुशांतसिंह राजपूतला मृत्यूपूर्वी अमली पदार्थ उपलब्ध केल्याचा आरोप असलेली अभिनेत्री रिया चक्रवर्तीला उच्च न्यायालयाने बुधवारी सशर्त जामीन मंजूर केला. त्यामुळे एक महिन्यानंतर रियाची कारागृहातून सुटका होणार आहे. न्यायालयाने रियासह दीपेश सावंत आणि सॅम्युअल मिरांडा यांनाही जामीन मंजूर केला आहे. रियाचा भाऊ शोविक आणि अब्देल परिहार यांना मात्र न्यायालयाने जामीन देण्यास नकार दिला.

रिया ही अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीची सक्रिय सदस्य असून ती तस्करीसाठी वित्तपुरवठा करत असल्याचा आरोप अमली पदार्थ नियंत्रण विभागाने (एनसीबी) रियाच्या जामिनाला विरोध करताना केला होता. मात्र अमली पदार्थांच्या विशिष्ट व्यवहारासाठी पैसे देणे हे तस्करीसाठी वित्तपुरवठा करणे होत नाही, असे नमूद करत न्यायमूर्ती सारंग कोतवाल यांनी रियाला जामीन मंजूर केला.

अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्याच्या कलम २७ (ए) नुसार रियावर आरोप ठेवण्यात आला आहे. हा आरोप सिद्ध झाल्यास १० वर्षांपर्यंतच्या कारावासाची शिक्षा तसेच जामीन न देण्याची तरतूद आहे. अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार, एखाद्या गुन्हेगाराला मदत करणे म्हणजे त्याला अमली पदार्थांसाठी पैसे उपलब्ध करणे, त्याला आश्रय आणि अन्न देणे अपेक्षित आहे. या प्रकरणाचा विचार करता सुशांतला याबाबत भीती असण्याचे कारण नव्हते. त्यामुळे या प्रकरणात उपरोक्त आरोपही लागू होऊ शकत नाही, असेही न्यायालयाने नमूद केले.

रियाला न्यायालयाने एक लाख रुपयांच्या, तर सावंतला ५० हजार रुपयांच्या हमीदारावर जामीन मंजूर केला. परंतु हमीदारांची त्वरित व्यवस्था होऊ शकणार नसल्याने सध्या रोखीच्या जामिनावर सुटकेची मुभा द्यावी, अशी विनंती रियाचे वकील सतीश मानेशिंदे यांनी न्यायालयाला केली. ती मंजूर करत रोख एक लाख रुपयांच्या जातमुचलक्यासह रियाची सुटका करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

**स्थगिती देण्यासही नकार**

रियाबाबतच्या निर्णयाला किमान एका आठवड्याची स्थगिती देण्याची मागणी एनसीबीतर्फे करण्यात आली. या प्रकरणी कायदेविषयक बरेच मुद्दे समाविष्ट आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान देऊन त्याची चाचपणी करायची असल्याचे एनसीबीतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी न्यायालयाला सांगितले. त्यावर तुम्हाला अजून काय चाचपणी करायची आहे, असा प्रश्न न्यायालयाने केला. तसेच निकालात अंमलीपदार्थ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (एनडीपीएस) येणारे सगळे गुन्हे अजामीनपात्र असल्याचे आम्ही नमूद केले आहे, असे सांगत एनसीबीची मागणी न्यायालयाने फेटाळली.

### ...म्हणून शोविकला जामीन नाकारला

शोविक हा अमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या टोळीचा भाग असल्याचे दिसून येते. सुशांतसाठी तो एकाकडून अमली पदार्थ घेत होता. यावरून अमली पदार्थांच्या तस्करीत त्याचा सहभाग होता. अमली पदार्थ तस्करांच्या टोळीचा तो एक महत्त्वपूर्ण दुवा असून अनेक अमली पदार्थ तस्कारांच्या तो संपर्कात होता. त्याने त्यांच्यासोबत आर्थिक व्यवहार केले आहेत. तपास सध्या प्राथमिक टप्प्यात असून अशा वेळी शोविकला जामीन मंजूर केल्यास त्याच्याकडून पुरावे नष्ट केले जाण्याची शक्यता आहे, असेही न्यायालयाने त्याचा जामीन नाकारताना स्पष्ट केले.

### एनसीबीला तपासाचा अधिकार

सुशांतच्या मृत्यूशी संबंधित प्रकरणाचा तपास करण्याचा अधिकार एनसीबीला नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांच्या पार्श्वभूमीवर तपास सीबीआयकडे गेला पाहिजे हा रिया आणि शोविकचे वकील सतीश मानेशिंदे यांचा दावा अमान्य केला.

### रियाला कायद्याची ती तरतूद लागू नाही

अमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार सगळे गुन्हे हे अजामीनपात्र आहेत. एखाद्याकडे व्यावसायिक प्रमाणात अमली पदार्थ आढळले नाही, तरी आरोपीवर कलम २७(ए) लावले जाऊ शकते. रियाच्या प्रकरणात तिने अमली पदार्थ तस्करांच्या टोळीला वित्तपुरवठा केलेला नाही वा त्यांना आश्रयही दिलेला नाही. त्यामुळे तिच्यावर हे कलम लावले जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सावंत आणि मिरांडाही सुशांत वा रियाच्या सांगण्यावरून केवळ अमली पदार्थ घेऊन घेत, असेही न्यायालयाने त्या दोघांची जामिनाची मागणी मान्य करताना म्हटले.

# उपनगरीय रेल्वेफेऱ्या वाढवण्याबाबत विचार करा!

## उच्च न्यायालयाचे राज्य आणि केंद्र सरकारला निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** करोनाचे संकट कायम असले तरी पुनश्च हरिओम म्हणत प्रत्येक महिन्याला टाळेबंदी अंशतः उठवली जात आहे. रेस्टॉरंट, मॉल्स सुरू झाले आहेत. सरकारी कार्यालयांसह अन्य क्षेत्रांतील कामेही पूर्ण क्षमतेने सुरू झाली आहेत. अशा वेळी लोकलच्या फेऱ्या मर्यादित किंबहुना अगदीच कमी ठेवण्याबाबत उच्च न्यायालयाने बुधवारी प्रश्न उपस्थित केला. तसेच लोकलच्या फेऱ्या वाढवण्याबाबत विचार करण्याचे निर्देश राज्य आणि केंद्र सरकारला दिले.

उच्च न्यायालयातील प्रत्यक्ष सुनावणीला हजर राहणाऱ्या वकिलांप्रमाणे कनिष्ठ न्यायालयांतील वकिलांनाही लोकल प्रवासाची मुभा देण्याच्या मागणीसाठी वकिलांच्या संघटनेने जनहित याचिका केली आहे. मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर बुधवारी सुनावणी झाली. त्या वेळी अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांसाठी लोकल चालवण्यात येत असून बनावट क्यूआर कोडचा वापर करून लोक प्रवास करत आहे. परिणामी, या लोकलमध्ये मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून अंतर नियमाचेही मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याचे राज्य सरकारतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

त्यावर टाळेबंदी हळूहळू शिथिल केली जात असून सरकारी कार्यालयांसह अन्य क्षेत्रांतील कार्यालयेही सुरू झाली आहेत. अशा वेळी लोकलची संख्या मर्यादित कशी काय ठेवली जाऊ शकते, अशी विचारणा न्यायालयाने केली. रेल्वेतर्फे यावेळी सादर केलेल्या तक्त्याचा आधार घेत टाळेबंदीपूर्वी पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वेवर चालवण्यात येणाऱ्या फेऱ्यांची संख्या लक्षात घेता सद्यःस्थितीला फारच कमी फेऱ्या चालवल्या जातात.

त्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. लोकलमधील गर्दी कमी करायची असल्यास फेऱ्या वाढवायला हव्यात, असे न्यायालयाने म्हटले. टाळेबंदीपूर्वी ज्या संख्येने फेऱ्या चालवण्यात येत होत्या त्यानुसार मध्य रेल्वेवर एक तृतीयांश, तर पश्चिम रेल्वेवर निम्म्या फेऱ्या चालवण्याबाबत तसेच त्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारला पाठवण्याचा विचार करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

### न्यायालय म्हणते...

आम्ही रेल्वे वा राज्य सरकारला लोकल फेऱ्यांची संख्या वाढवण्याचे आदेश देऊ शकत नाही, परंतु आमच्या सूचनेबाबत राज्य सरकार अनुकूल प्रतिसाद देईल. आमची सूचना ही केवळ वकिलांपुरती मर्यादित नाही, तर सर्वसामान्यांसाठीही आहे.

### निर्णय कशाच्या आधारे?

गेल्या दोन महिन्यांच्या तुलनेत सप्टेंबर महिन्यात लोकलच्या अगदीच कमी फेऱ्या वाढवण्यात आल्याची न्यायालयाने दखल घेतली. सप्टेंबर महिन्यात एवढ्या कमी फेऱ्या का वाढवल्या, अशी विचारणा करत लोकल फेऱ्या वाढवण्याचा निर्णय कशाच्या आधारे घेतला जातो याचा तपशील सादर करण्याचे आदेश न्यायालयाने रेल्वेला दिले.

## राज्यांतर्गत आणखी पाच विशेष रेल्वे गाड्या

मुंबई ते पुणेसह नागपूर, गोंदिया, सोलापूरसाठी गाड्यांचा समावेश; ९ ऑक्टोबरपासून सेवेत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईतून नाशिक आणि कोकणसाठी दोन विशेष रेल्वे गाड्या सुरू के ल्यानंतर आता राज्यांतर्गत आणखी पाच गाड्या सुरू करण्याचा निर्णय मध्य रेल्वेने घेतला. मुंबई ते पुणे ते मुंबई, मुंबई ते नागपूर ते मुंबई दुरोन्तो, मुंबई ते सोलापूर ते मुंबई आणि मुंबई ते गोंदिया ते मुंबई या विशेष गाड्या असल्याची माहिती देण्यात आली. या गाड्या ९ ऑक्टोबरपासून सेवेत येत असून त्यांच्या आरक्षणाला गुरुवारपासून सुरुवात होत आहे. नियमित गाड्यांप्रमाणे त्या दररोज धावणार आहेत. तिकीटधारी (कन्फर्म) असणाऱ्या प्रवाशांनाच परवानगी असणार असल्याचेही रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले.



### पाच विशेष रेल्वे गाड्यांची माहिती

- मुंबई ते पुणे ते मुंबई सुपरफास्ट (डेक्कन क्वीन एक्स्प्रेस वेळापत्रकानुसार)
  गाडी क्र. ०२१२३ सीएसएमटीतून ९ ऑक्टोबरपासून सायं. ५.१० वा. सुटेल
  गाडी क्र. ०२१२४ पुणे येथून १० ऑक्टोबरपासून सकाळी ७.१५ वा. सुटेल
- मुंबई ते पुणे ते मुंबई सुपरफास्ट (इंद्रायणी एक्स्प्रेस वेळापत्रकानुसार)
  गाडी क्र. ०२०१५ सीएसएमटीतून ९ ऑक्टोबरपासून पहाटे ५.४० वा. सुटेल
  गाडी क्र. ०२०१६ पुणे येथून १० ऑक्टोबरपासून सायंकाळी ६.३५ वा. सुटेल
- मुंबई ते नागपूर ते मुंबई दुरोन्तो (नागपूर दुरोन्तो वेळापत्रकानुसार)
  गाडी क्र. ०२१९० नागपूरमधून ९ ऑक्टोबरपासून रात्री ८.४० वाजता सुटेल
  गाडी क्र. ०२१८९ सीएसएमटीतून १० ऑक्टोबरपासून रात्री ८.१५ वा. सुटेल
  (या गाडीला इगतपुरीला थांबा देण्यात आलेला नाही.)
- मुंबई ते गोंदिया ते मुंबई सुपरफास्ट (विदर्भ एक्स्प्रेस वेळापत्रकानुसार)
  गाडी क्र. ०२१०५ सीएसएमटीतून ९ ऑक्टोबरपासून रात्री ७.१० वा. सुटेल
  गाडी क्र. ०२१०६ गोंदियातून १० ऑक्टोबरपासून दुपारी २.५५ वा. सुटेल
  (या गाडीला इगतपुरीला थांबा देण्यात आलेला नाही.)
- मुंबई ते सोलापूर ते मुंबई सुपरफास्ट (सिद्धेश्वर एक्स्प्रेस वेळापत्रकानुसार)
  गाडी क्र. ०२११५ सीएसएमटीतून ९ ऑक्टोबरपासून रात्री १०.४५ वा. सुटेल
  गाडी क्र. ०२११६ सोलापुरातून १० ऑक्टोबरपासून रात्री १०.४० वा. सुटेल
  (या गाडीला कर्जत, खंडाळा, लोणावळा, माढा, मोहोळ, भिगवान येथे थांबा नाही.)

**तेजस एक्स्प्रेसही सेवेत...**

सणांच्या निमित्ताने १७ ऑक्टोबरपासून अहमदाबाद-मुंबई ते अहमदाबाद आणि लखनौ ते नवी दिल्ली तेजस एक्स्प्रेसही सुरू होण्याची शक्यता असल्याचे आयआरसीटीसीने (इंडियन रेल्वे कॅटरिंग अ‍ॅण्ड टूरिझम कॉर्पोरेशन) सांगितले. त्यासाठी रेल्वे मंत्रालयाशी चर्चाही केली जात आहे. करोनामुळे १९ मार्च २०२० पासून या गाड्यांची सेवा बंद करण्यात आली होती.

# मुंबईत २८४८ नवे रुग्ण, ४६ मृत्यू

## चाचण्यांची संख्या १२ लाखांहून अधिक

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** मुंबईत बुधवारी २८४८ नवीन रुग्णांची नोंद झाली. आतापर्यंतची ही एका दिवसातील सर्वात मोठी संख्या आहे. त्याचबरोबर २२५७ रुग्ण बरे होऊन घरीही गेले आहेत. मुंबईतील चाचण्यांची एकूण संख्या १२ लाखांच्यापुढे गेली आहे.

मुंबईतील रुग्णवाढीचा वेग कमी होत चाललेला असला तरी दर दिवशी आढळणाऱ्या रुग्णसंख्येत मात्र चढउतार होत आहेत. मंगळवारी एकदम कमी रुग्ण आढळलेले असताना बुधवारी मात्र गेल्या सहा महिन्यांतील सर्वात जास्त रुग्णांची नोंद झाली. २८४८ रुग्णांची नोंद झाल्यामुळे एकूण बाधितांची संख्या २,१९,९३८ वर गेली आहे. तर २२५७ रुग्ण एका दिवसात बरे होऊन घरी गेल्यामुळे आतापर्यंत १,८३,७४२ म्हणजेच ८३ टक्के रुग्ण करोनामुक्त झाले आहेत. तर २४,७८३ रुग्ण उपचाराधीन आहेत.

दिवसभरातील मृतांची संख्या ही गेल्या महिन्याभरापासून सरासरी ४५ पर्यंत आहे. बुधवारीही ४६ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली. त्यात ३९ रुग्णांना काही दीर्घकालीन आजार होते. मृतांमध्ये ३३ पुरुष व १३ महिला होत्या. २९ रुग्णांचे वय ६० वर्षांवर होते. मृतांची एकूण संख्या ९२४५ वर गेली आहे. तर मुंबईचा मृत्यूदर ४ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे.

मुंबईत आतापर्यंत १२ लाख चाचण्या करण्यात आल्या. एकूण चाचण्यांपैकी चार लाखांहून अधिक चाचण्या या १ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत करण्यात आल्या आहेत. रोज ११ ते १५ हजार चाचण्या केल्या जात आहेत. त्यापैकी २० ते २२ टक्के बाधित आहेत.

### राज्यात दिवसभरात १४,५७८ रुग्णवाढ

मुंबई : राज्यात १४,५७८ नव्या रुग्णांचे निदान झाले असून, ३५५ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला. गेले महिनाभर पुण्यात जास्त रुग्ण आढळले होते. पण पुण्यातील रुग्णसंख्या तुलनेत घटली असून, मुंबईतील रुग्णसंख्या वाढली आहे. गेल्या २४ तासांत १६,७१५ रुग्ण बरे होऊन घरी परतले. राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण हे ८० टक्के झाले आहे. सध्या २ लाख ४४ हजार रुग्ण उपचाराधीन आहेत. राज्यातील एकूण करोनाबाधित रुग्णांची संख्या १४ लाख ८०हजार झाली असून, आतापर्यंत ३९,०७२ जणांचा मृत्यू झाला.



छाया-अमित चक्रवर्ती

### ठाणे जिल्ह्यात दिवसभरात १,८५५ बाधित

ठाणे : जिल्ह्यात बुधवारी १ हजार ८५५ नवे करोना रुग्ण आढळून आले. त्यामुळे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णांची संख्या १ लाख ८५ हजार ७९७ वर पोहोचली. तर, दिवसभरात ४३ करोना रुग्णांचा मृत्यू झाला असून जिल्ह्यातील एकूण मृत्यू झालेल्यांची संख्या ४ हजार ६८७ वर पोहोचली. ठाणे शहरातील ४१४, कल्याण-डोंबिवलीतील ३८९, नवी मुंबईतील ३५६, ठाणे ग्रामीणमधील २९५, मीरा-भाईंदरमधील २२१, अंबरनाथ शहरातील ५८, बदलापुरातील ४५, भिवंडी शहरातील ४१ आणि उल्हासनगर शहरातील ३६ रुग्णांचा समावेश आहे.

## अदानीच्या वीज कर्मचारी संपावर मेस्माचा बडगा

**मुंबई :** मुंबई उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि. च्या एका कर्मचारी संघटनेने गुरुवारपासून बेमुदत संपाचा इशारा दिल्यानंतर राज्य सरकारने मेस्माचा बडगा उगारत कारवाईचा इशारा दिल्याने संप बारगळला आहे. अदानीचे मुंबई उपनगरात २५ लाखांहून अधिक ग्राहक असून संप झाल्यास वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती होती. अदानीचे सुमारे ८५०० कर्मचारी असून ९ कर्मचारी संघटना आहेत. त्यापैकी एका संघटनेने संपाचा इशारा दिला होता. वीज क्षेत्र अत्यावश्यक सेवा क्षेत्रात असल्याने सरकारने मेस्माचा बडगा उगारला.






# ‘एन-९५’ मुखपट्टी आता ४९ रुपयांत

## आरोग्य विभागाकडून किमतीवर नियंत्रण

संदीप आचार्य, लोकसत्ता

**मुंबई :** राज्यात करोनाचे रुग्ण वेगाने वाढत असतानाच एन-९५ मुखपट्टीच्या किमती कमी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे. यापुढे एन-९५ मुखपट्टी १९ ते ४९ रुपयांहून अधिक किमतीला विकता येणार नाही.

आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी मुखपट्टी व सॅनिटायझरचे दर कमी करण्यासाठी ३१ जुलै रोजी एक समिती नेमली होती. या समितीचा अहवाल तीन दिवसांत मिळणे अपेक्षित होते. मात्र मुखपट्टीच्या किमतीचे प्रत्यक्ष गणित समजावून घेण्यात अनेक अडचणींचा सामना या समितीला करावा लागला. एन-९५ मुखपट्टी बनविणाऱ्या कंपन्यांनी कच्चा माल, सामग्री तसेच नफ्याचे प्रमाण, उत्पादन खर्च आदींची माहिती देण्यास टाळाटाळ केली.

या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्र्यांनी साथरोग नियंत्रण कायदा १८९७ तसेच अन्य कायद्यांचा आधार घेत थेट कंपनीत जाऊन तपासणीचे आदेश दिले. त्यानुसार कंपनीचे दप्तर तपासण्यासह, कच्चा मालाचे, मजुरीचे दर वाढले का, अशा सर्व बाबी तपासण्यात आल्या. त्याचप्रमाणे मुखपट्ट्या बनविणाऱ्या दोन मोठ्या कंपन्यांचा मागील काही वर्षांतील टाळेबंदही तपासण्यात आला. यात २०१५ पासून २०२० पर्यंत कच्च्या मालात, तसेच उत्पादन खर्चात फारशी वाढ झाली नसल्याचे स्पष्ट झाले.

### झाले काय?

- १३ मार्च २०२० रोजी एन-९५ मुखपट्टीसह सहा वेगवेगळ्या मुखपट्ट्या, सॅनिटाइजर हे ‘अत्यावश्यक वस्तू कायदा १९५५’ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले. मात्र ३० जून २०२० रोजी केंद्र सरकारने मुखपट्टी व सॅनिटाइजरला अत्यावश्यक वस्तू कायद्यामधून वगळले. याचाच फायदा घेत कंपन्यांनी मुखपट्टीच्या किमती ४०० पट वाढविल्याचे आरोग्य विभागाच्या ज्येष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.
- हे कमी ठरावे म्हणून केंद्राच्या ‘एचएलएल’ कंपनीने दोन डॉलरला एन-९५ मुखपट्ट्या परदेशातून विकत घेतल्या. जवळपास दीडशे रुपयांना या मुखपट्ट्या केंद्र सरकारनेच खरेदी केल्यामुळे मुखपट्ट्या बनविणाऱ्या कंपन्यांनीही आपले दर हवे तसे वाढवले. तेव्हापासून ही लूटमार आजपर्यंत सुरू असल्याचे आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.


**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**

SJSB Multi-State Scheduled Coop.Bank

मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक

‘गगनभरारी’ शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७

**सोलापूर जनता सहकारी बँकेच्या सभासदांना आवाहन**

सोलापूर जनता बँकेच्या सर्व सभासदांना आवाहन करण्यात येते की, 31.03.2020 ची बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा सध्याच्या कोविड १९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर नजीकच्या काळात **Other Audio Visual Means (OAVM)** (दृकश्राव्य माध्यम) पद्धतीने घेतली जाणार आहे. यास मा. केंद्रिय निबंधक, मल्टीस्टेट सहकारी संस्था, नवी दिल्लीचे परिपत्रक जा.क्र. **R-11017/101/2015-L&M** दि. **25.08.2020** नुसार मान्यता आहे.

याबाबत विनंती करण्यात येते की दि. 31.03.2020 रोजी बँकेचे जे सभासद आहे त्यांनी 1. आपले नाव 2. सभासद नंबर 3. मोबाईल नंबर (भ्रमणध्वनी नंबर) 4. **Email ID** हे आपल्या नजीकच्या बँकेच्या शाखेत किंवा बँकेने तयार केलेल्या बँकेच्या विशेष **Email ID** वर म्हणजेच **agm2020@sjsbbank.com** दि. 31.10.2020 अखेर अगर तत्पूर्वी द्यावी की ज्यायोगे सदर **OAVM** पध्दतीच्या वार्षिक सभेची लिंक आणि पासवर्ड बँकेस या रजिस्टर्ड मोबाईल किंवा **Email ID** यावर पाठवता येईल.

या अगोदर ज्या सभासदांनी वरील माहिती (**details**) बँकेत आणून दिली असेल त्यांनी ह्या नोटीसीप्रमाणे पूर्तता करण्याची आवश्यकता नाही.

**तारीख : 07.10.2020**

सही /-
**प्रकाश भा. वाईकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी



**टाटा** मोटर्स लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई-४०० ००१.
वेबसाइट : www.tatamotors.com, ईमेल : inv_rel@tatamotors.com,
कॉर्पोरेट आयडेन्टिफिकेशन नं. (सीआयएन) : एल२८९२०एमएच१९४५पीएलसी००४५२०

**सूचना**

कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१)च्या अनुसार याद्वारा सूचना देण्यात येते की, ०१ ऑक्टोबर २०२० पासून ते ३१ डिसेंबर २०२० पर्यंत बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज लिमिटेड आणि/किंवा नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या होलसेल डेब्ट मार्केट सेगमेंट्सवरील सूचीबद्ध व प्रायव्हेट प्लेसमेंट आधारित निर्गमित केलेल्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांवरील व्याज/विमोचन प्रक्रिया सुरू आहे, ज्यांचे नियत खालीलप्रमाणे आहेत.

| प्रतिभूतीचे आयएसआयएन | प्रतिभूतीचे वर्णन | यावर सूचीबद्ध | रेकॉर्ड तारीख | प्रयोजनार्थ |
|---|---|---|---|---|
| आयएनई१५५ए०८२३३ (ई-२६ई सीरिज) | रु. ४०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.६०% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : २९ ऑक्टोबर २०२२ | एनएसई व बीएसई | १३ ऑक्टो. २०२० | २९ ऑक्टो. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८२४१ (ई-२६एफ सीरिज) | रु. ४०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.३५% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : १० नोव्हेंबर २०२३ | एनएसई व बीएसई | २४ ऑक्टो. २०२० | १० नोव्हें. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८२५८ (ई-२६जी सीरिज) | रु. ३०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.०२% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : १० डिसेंबर २०२१ | एनएसई व बीएसई | २५ नोव्हें. २०२० | ११ डिसें. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८३१६ (ई-२७ई सीरिज) | रु. ३०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ७.५०% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : १० ऑक्टोबर २०२१ | एनएसई व बीएसई | ०३ ऑक्टो. २०२० | २० ऑक्टो. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८३८१ (ई-२८ए सीरिज ट्रान्चे I) | रु. २०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.२७% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : ३० जून २०२३ | एनएसई व बीएसई | ३१ ऑक्टो. २०२० | १७ नोव्हें. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८३७३ (ई-२८ए सीरिज ट्रान्चे II) | रु. २०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.३१% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : २९ सप्टेंबर २०२३ | एनएसई व बीएसई | ३१ ऑक्टो. २०२० | १७ नोव्हें. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |
| आयएनई१५५ए०८३९९ (ई-२८ए सीरिज ट्रान्चे III) | रु. १०० कोटींच्या दरातील, सूचीबद्ध, असुरक्षित, ९.५४% कूपन, विमोचनीय अपरिवर्तनीय ऋणपत्रांचे निर्गमन मॅच्युरिटीची तारीख : २८ जून २०२४ | एनएसई व बीएसई | ३१ ऑक्टो. २०२० | १७ नोव्हें. २०२० रोजी वार्षिक व्याजाचे प्रदान |

टाटा मोटर्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
होशंग के. सेठना
कंपनी सचिव

मुंबई
०७ ऑक्टोबर २०२०

TATA